# देगलूर महाविद्यालयात पदवी वितरण संपन्न

**देगलूर/ प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व अडत व्यापारी शिक्षण संस्था संचालित देगलूर महाविद्यालय,देगलूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यापीठ पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न झाला.



अध्यक्षस्थानी अ. व्या. शि. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर व प्रमुख पाहुणे म्हणून अ. व्या. शि. संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागिरे,सहसचिव सूर्यकांत नारलावार, कार्यकारिणी सदस्य रवींद्र द्याडे उपस्थित होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार , महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ. लक्ष्मण सुदाम , डॉ. संजय पाटील , डॉ. सर्जेराव रणखांब , डॉ. किशन सुनेवार व राजू जंगीलवार उपस्थित होते.

प्रारंभी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून मान्यवरांच्या उपस्थितीत मिरवणूक काढण्यात आली.मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व स्वामीजींच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. नंतर विद्यापीठ गीत गायन झाले. प्रास्ताविक परीक्षा विभाग प्रमुख डॉ. राजेश्वर दुडूकनाळे यांनी केले. त्यानंतर बीजभाषण डॉ. सर्जेराव रणखांब यांनी केले. याप्रसंगी एम.ए. लोकप्रशासन विषयात विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत सर्वद्वितीय आलेल्या कु. प्रणिता मुतेपवार यांचा शाल,श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात एकूण ५६ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. आर. बी. लक्षटे तर आभार प्रदर्शन डॉ. बालाजी कत्तुरवार यांनी केले. समारोप सामूहिक राष्ट्रगीताने करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परीक्षा नियोजन समितीसह व कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी नळगीरकर, किशन पांचाळ, प्रशांत चव्हाण, प्रकाश सोनकांबळे व सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

Scanned with CamScanner